सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्यातील स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या शासन मान्य व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या निवासी/अनिवासी विशेष शाळा/ कर्मशाळा व मतिमंद बालगृहे यामधील पूर्णवेळ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक इडीडी-२०१९/प्र.क्र.१२०/दि.क.१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २३ एप्रिल, २०२१.

वाचा -

१. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. इडीडी-२००९/ प्र.क्र.२३८/सुधार-२, दि.४ डिसेंबर, २००९.
२. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र. एसआरव्ही - १०८९/४८६७७/के.नं.६६५/सुधार-२, दि.५ जून, १९९२.
३. शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग क्र. इडीडी-२००३/प्र क्र ३४०/भाग-३/ सुधार-२ दि. १८.८.२००४.
४. शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग क्र. इडीडी-२०१२/प्र क्र २७६/अ.क.१, दि.२२.६.२०१५.
५. शासन निर्णय वित्त विभाग क्र. वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९, दि.१ जानेवारी, २०१९.
६. शासन अधिसूचना वित्त विभाग क्र. वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि. ३० जानेवारी, २०१९.
७. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. वेपुर २०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२० फेब्रुवारी २०१९.
८. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. वेपुर २०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.१४ मे, २०१९.
९. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. वेपुर २०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.३० मे, २०१९.
१०.शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि.२ मार्च, २०१९.
११.आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र. अकआ/प्र-सर्व/७ वा वेतन आयोग/२०२०-२१, दि.८.२.२०२१.

प्रस्तावना :-

सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याकरीता श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी शासनाने काही फेरफारासह स्वीकृत करण्याचा निर्णय संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्या अनुषंगाने इतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांबरोबर शासकीय शाळांतील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दि.१ जानेवारी, २०१६ पासून सुधारित

वेतन संरचना लागू करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ च्या संदर्भ क्र.६ अन्वये अधिसूचित केले आहेत. तसेच संदर्भ क्र.७ च्या परिपत्रकानुसार प्रारंभिक वेतन निश्चितीबाबत व थकबाकी अदा करण्यासंदर्भात सविस्तर कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदानीत तत्वावर चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये व सैनिकी शाळातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांना शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.वेतन १२१९/ प्र.क्र.१९/१९/टिएनटी-३, दि.२२ फेब्रुवारी २०१९ अन्वये सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यातील स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या शासन मान्य व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या निवासी/अनिवासी विशेष शाळा/ कर्मशाळा व मतिमंद बालगृहे यामधील पूर्णवेळ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

**<u>शासन निर्णय</u> :-**

सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यातील स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या शासन मान्य व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या निवासी/अनिवासी विशेष शाळा/ कर्मशाळा व मतिमंद बालगृहे यामधील पूर्णवेळ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सोबतच्या विवरणपत्र-१ व विवरणपत्र-२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारित वेतन संरचना मंजूर करण्यात येत आहे.

२. सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती आणि त्यानुषंगाने अनुज्ञेय थकबाकीचे प्रदान संदर्भाधीन क्र.६ येथील शासन अधिसूचना वित्त विभाग दि.३० जानेवारी, २०१९, संदर्भाधीन क्र.७ येथील शासन परिपत्रक वित्त विभाग दि.२० फेब्रुवारी, २०१९, संदर्भाधीन क्र.८ येथील शासन परिपत्रक वित्त विभाग दि.१४ मे, २०१९ आणि संदर्भाधीन क्र.९ येथील शासन परिपत्रक वित्त विभाग दि.३० मे, २०१९ मधील तरतुदीनुसार करण्यात यावे. यासाठी सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर यांनी आपल्या स्तरावर वेतननिश्चितीबाबतचे शिबीर तातडीने आयोजित करुन वेतननिश्चितीबाबतची कार्यवाही करावी व यथावकाश आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्या कार्यालयामार्फत त्याची पडताळणी करावी. वेतननिश्चितीमुळे भविष्यात कमी /जास्त रक्कम अदा केली गेली असल्यास ती वसूल करण्यास माझी हरकत राहणार नाही, असे हमीपत्र संबंधितांकडून घेण्यात यावे. तसेच खालील बाबीची पडताळणी करुन संबंधितांची वेतननिश्चिती करावी :-

(१) सातव्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती करतांना भारतीय पुनर्वास परिषदेने पदनिहाय ठरवून दिलेल्या पात्रतेप्रमाणे तपासणी करावी.

(२) ज्या दिव्यांगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांना शासन निर्णय दि.१८.८.२००४ च्या कर्मचारी आकृतीबंधानुसार पदमंजुरी देण्यात आलेली आहे, त्या पदावरील नियुक्त कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रता व अर्हता शासन निर्णय दि.१८.८.२००४ मधील पात्रतेच्या निकषांनुसार संबंधीत सक्षम प्राधिकारी / वेतननिश्चिती अधिकाऱ्याने तपासून त्यानंतरच सातव्या वेतन आयोगाचे लाभ संबंधीत कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय करावेत.

(३) ज्या दिव्यांगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांना शासन निर्णय दि.१८.८.२००४ च्या पूर्वीच्या तत्कालीन कर्मचारी आकृतीबंधानुसार पदमंजुरी देण्यात आलेली आहे. त्या पदांवरील नियुक्ती कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रता व अर्हता तत्कालीन कर्मचारी आकृतीबंधातील / शाळा संहितेतील नमूद पात्रतेच्या निकषांनुसार संबंधीत सक्षम प्राधिकारी / वेतननिश्चिती अधिकाऱ्याने तपासून त्यानंतरच सातव्या वेतन आयोगाचे लाभ संबंधीत कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय करावेत.

(४) सातव्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती करतांना, जी पदे शासन निर्णय दि.१८.८.२००४ अन्वये मंजूर आहेत व सदरची पदे भरलेली आहेत आणि त्या पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना संबंधीत प्राधिकाऱ्याकडून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहेत, ती पदे संबंधीत कर्मचाऱ्यांचा मृत्यू, नोकरी सोडणे, नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती, राजीनामा किंवा इतर कारणाने कालांतराने रिक्त झालेली असल्यास, त्या रिक्त पदांवरील पदभरतीस आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांचे ना-हरकत प्रमाणपत्र असल्याची तपासणी करण्यात यावी.

(५) शासन निर्णयाप्रमाणे दिव्यांगांच्या शाळा व कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांची नेमणूक करतांना बिंदुनामावली मागासवर्गीय कक्षाकडून तपासून त्यानुसार पदावर नेमणूक करणे बंधनकारक असते. त्यामुळे सातव्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती करतांना मागासवर्गीय कक्षाकडून सदरील पद हे बिंदुनामावलीनुसार भरले असल्याची खात्री करावी.

(६) याशिवाय शासन निर्णय दि.१८.८.२००४ च्या शासन निर्णयापूर्वी ज्या शाळा व कर्मशाळा अनुदान तत्वावर कार्यरत आहेत आणि अशा शाळा व कर्मशाळांना शासन निर्णय दि.१८.८.२००४ अन्वये अनुज्ञेय ठरणारी जास्तीची पदे शासनाने मंजूर केलेली नाहीत व ती पदे भरण्यास कोणत्याही स्वरूपाची मंजूर दिलेली नाही. परंतू अशा अनुज्ञेय ठरणाऱ्या पदभरतीस मंजूरी नसलेल्या पदावंर शाळा व्यवस्थापनाने परस्पर व विना परवाना पद भरती केलेली आहे, अशा पदभरती केलेल्या पदांवरील कर्मचाऱ्यांना संबंधीत न्यायालयीन प्रकरणी अंतरीम आदेशान्वये संरक्षण मिळालेले असल्याची खात्री करून त्यांची वेतननिश्चिती करावी.

३. सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यासाठी आवश्यक तो विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत देण्यात यावा. एकदा दिलेला विकल्प अंतिम राहील.

४. या आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या सुधारीत वेतन संरचनेमुळे होणारा अतिरिक्त खर्च शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशिर्षासाठी खर्ची घालण्यात येतो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी सुधारित अंदाज तयार करताना अतिरिक्त खर्च विचारात घ्यावा. सदरहू शासन निर्णय हा सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याच्या अनुषंगाने असून या शासन निर्णयानुसार कोणतेही नवीन पद निर्माण करण्यास मंजुरी दिली जाणार नाही.

५. शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्र इडीडी २००३/ प्र.क्र.३४०/भाग-३/सुधार-२, दि.१८.८.२००४ मधील विवरण पत्र "अ" मध्ये नमूद करण्यात आलेल्या कंत्राटी व एकत्रित वेतनावरील अंशकालीन कर्मचाऱ्यांना सदर सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. त्यांना पूर्वी प्रमाणेच एकत्रित वेतन अनुज्ञेय राहील.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६७/२०२१/सेवा-९, दि.२४.२.२०२१ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०४२३१५४८५३२८२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

यासोबत विवरणपत्र-१ व विवरणपत्र-२ जोडण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:04:34 +05'30'

**( दि. रा. डिंगळे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव प्रधान सचिव
३. मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६. मा.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक
७. मा.प्रधान सचिव, सा.न्या.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर

९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर
१०. आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग
१५. सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग
१६. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१७. अवर सचिव, वित्त विभाग, सेवा-९, मंत्रालय, मुंबई
१८. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. निवड नस्ती, दिव्यांग कल्याण-१

*****

# विवरणपत्र-१

(अ) <u>शा.नि. दि.१८.८.२००४ रोजीच्या आकृतिबंधानुसार मंजूर पदे</u> :-

(१) शासन निर्णय दि.१८.८.२००४ चे आकृतीबंधानुसार अनुज्ञेय असलेल्या अशासकीय दिव्यांगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळा व संलग्न वसतीगृहे यामधील शिक्षक आणि शिक्षकेतर संवर्गांना ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतनस्तर :-

| अक्र | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी (६ वा आयोग) | | ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर (रु.) |
|---|---|---|---|---|
| | | वेतनबॅन्ड (रु.) | ग्रेड वेतन (रु) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | दिव्यांगांच्या विशेष शाळा विभाग | | | |
| १ | मुख्याध्यापक (कनिष्ठ स्तर) ५० ते १०० च्या दरम्यान विद्यार्थी संख्या | पीबी - २ ९३००-३४८०० | ४३०० | एस - १४ ३८६००-१२२८०० |
| २ | मुख्याध्यापक (वरिष्ठ स्तर) १०० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या | पीबी - २ ९३००-३४८०० | ४४०० | एस - १५ ४१८००-१३२३०० |
| ३ | विशेष शिक्षक | पी बी - १ ५२००-२०२०० | २८०० | एस - १० : २९२००-९२३०० |
| ४ | शारिरीक शिक्षण/ निदेशक/ कला,हस्त व्यवसाय शिक्षक | पी बी - १ ५२००-२०२०० | २८०० | एस - १० २९२००-९२३०० |
| ५ | संगीत शिक्षक | पी बी - १ ५२००-२०२०० | २८०० | एस - १० : २९२००-९२३०० |
| ६ | निम वैद्यकीय कर्मचारी<br>(अ)- अंध- चलन अवयव निदेशक<br>(ब)- मुकबधीर- स्पीच थॅरपिस्ट<br>(क) मतीमंद- मानस शास्त्रज्ञ अथवा व्यवसाय उपचार तज्ञ अथवा भौतिक उपचार तज्ञ<br>(ड) स्पास्टीक- फिजीओ थॅरापीस्ट अथवा व्यवसायोपचार तज्ञ<br>(इ) अस्थीव्यंग- फिजीओ थॅरापीस्ट अथवा व्यवसायोपचार तज्ञ | पी बी - २ ९३००-३४८०० | ४३०० | एस - १४ : ३८६००-१२२८०० |

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:04:52 +05'30'

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | काळजी वाहक<br>सदर पद दरमहा रु २०००/- प्रमाणे प्रथम ३ वर्षाकरीता व ३ वर्षानंतर नियमीत वेतनश्रेणी रु २५५०-३२०० | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| | **दिव्यांग शाळा कार्यालय विभाग** | | | |
| ८ | लेखापाल<br>१०० पेक्षा जास्त विद्यार्थांच्या शाळेसाठी | पी बी - १<br>५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |
| ९ | कनिष्ठ लिपीक नि- लेखापाल<br>५० ते १०० पर्यत विद्यार्थी असलेल्या शाळेसाठी | पी बी - १<br>५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| १० | शिपाई | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| | **निवासी दिव्यांग शाळा वसतीगृह विभाग** | | | |
| ११ | अधिक्षक | पी बी - १<br>५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| १२ | स्वयंपाकी | १ एस<br>४४४०-७४४० | १६०० | एस - ३ : १६६००-५२४०० |
| १३ | राखणदार/ काळजी वाहक<br>सदर पद दरमहा रु २०००/- प्रमाणे प्रथम ३ वर्षाकरीता व ३ वर्षानंतर नियमीत वेतनश्रेणी रु २५५०-३२०० | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| १४ | परिचारीका<br>मतीमंद शाळेसाठी | पी बी - १<br>५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |
| | **कर्मशाळा विभाग** | | | |
| १५ | व्यव. अधिक्षक | पी बी - २<br>९३००-३४८०० | ४३०० | एस - १४ :<br>३८६००-१२२८०० |
| १६ | निदेशक (अ, ब, क वर्ग) | पी बी - १<br>५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |
| १७ | लेखापाल,<br>१०० अथवा १०० पेक्षा जास्त विद्यार्थांच्या कार्यशाळेसाठी | पी बी - १<br>५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |
| १८ | लिपीक नि- लेखापाल<br>५० अथवा १०० पेक्षा कमी विद्यार्थ्यांच्या कार्यशाळेसाठी | पी बी - १<br>५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| १९ | कार्यशाळा मदतनीस | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:05:03 +05'30'

| निवासी कर्मशाळा वसतीगृह विभाग | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | गृहपाल | पी बी - १ ५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| २१ | स्वयंपाकी | १ एस ४४४०-७४४० | १६०० | एस - ३ : १६६००-५२४०० |
| २२ | राखणदार/ काळजी वाहक सदर पद दरमहा रु २०००/- प्रमाणे प्रथम ३ वर्षाकरीता व ३ वर्षानंतर नियमीत वेतनश्रेणी रु २५५०-३२०० | १ एस ४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |

**(२) शासन निर्णय दि.२२.६.२०१५ नुसार महिला व बाल विकास विभागाकडून सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरीत झालेल्या अनुदानित मतिमंद बालगृहातील पूर्णवेळ शिक्षक आणि शिक्षकेतर संवर्गांना ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतन स्तर :-**

| अ.क्र. | पदनाम | विद्यमान वेतन संरचना | | ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर (रु.) |
|---|---|---|---|---|
| | | वेतन बॅन्ड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मुख्याध्यापक (कनिष्ठ स्तर) | पी बी - २ ९३००-३४८०० | ४३०० | एस - १४ : ३८६००-१२२८०० |
| २ | कार्यशाळा व्यवस्थापक/व्यवसाय अधिक्षक | पी बी - २ ९३००-३४८०० | ४३०० | एस - १४ : ३८६००-१२२८०० |
| ३ | विशेष शिक्षक | पी बी - १ ५२००-२०२०० | २८०० | एस - १० : २९२००-९२३०० |
| ४ | कला/संगीत/ हस्तव्यवसाय/शारिरीक शिक्षक | पी बी - १ ५२००-२०२०० | २८०० | एस - १० : २९२००-९२३०० |
| ५ | निदेशक | पी बी - १ ५२००-२०२०० | २८०० | एस - १० : २९२००-९२३०० |
| ६ | निम वैदयकिय कर्मचारी भौतिक उपचार तज्ञ/व्यवसायोपचार तज्ञ/ मानस शास्त्रज्ञ | पी बी - २ ९३००-३४८०० | ४३०० | एस - १४ : ३८६००-१२२८०० |
| ७ | वैदयकिय अधिकारी | पी बी - २ ९३००-३४८०० | ४३०० | एस - १४ : ३८६००-१२२८०० |
| ८ | काळजी वाहक | १ एस ४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:05:14 +05'30'

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | सफाईगार | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| १० | लेखापाल | पी बी - १<br>५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |
| ११ | कनिष्ठ लिपीक नि लेखापाल | पी बी - १<br>५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| १२ | अधिसेविका | पी बी - १<br>५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| १३ | शिपाई | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| १४ | गृहपाल | पी बी - १<br>५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| १५ | वसतिगृह अधिक्षक | पी बी - १<br>५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| १६ | स्वयंपाकी | १ एस<br>४४४०-७४४० | १६०० | एस - ३ : १६६००-५२४०० |
| १७ | मदतनीस | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| १८ | पहारेकरी | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| १९ | परिचारिका | पी बी - १<br>५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:05:24 +05'30'

# विवरणपत्र-२

(ब) दिव्यांग शाळा सहिंता १९८५ व १९९७ नुसार पदे (दि.१८.८.२००४ पूर्वीची पदे):-

(१) स्वयंसेवी संस्थामार्फत अपंगांसाठी चालविण्यात येणाऱ्या विशेष शाळातील पूर्णवेळ शिक्षक आणि शिक्षकेत्तर संवर्गांना ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतन स्तर :-

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी (६ वा वेतन आयोग ) | | ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर (रु.) |
|---|---|---|---|---|
| | | वेतन बॅन्ड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | |
| १ | २ | ३ | | ४ |
| १ | प्राचार्य/मुख्याध्यापक | | | |
| | अ) ७५ च्या वरील विदयार्थी गट संबंधीत प्रवर्गातील दिव्यांगांना शिकविण्यासाठी मान्यता | पी बी - २ ९३००-३४८०० (मूळ/वरिष्ठश्रेणी) | ४४०० | एस - १५ : ४१८००-१३२३०० |
| | | पी बी - २ ९३००-३४८०० (निवडश्रेणी) | ४८०० | एस - १७ : ४७६००-१५११०० |
| | ब) ५० किंवा त्याच्या आतील विदयार्थी गट | पी बी - २ ९३००-३४८०० (मूळश्रेणी) | ४२०० | एस - १३ : ३५४००-११२४०० |
| | | पी बी - २ ९३००-३४८०० (वरिष्ठश्रेणी) | ४३०० | एस - १४ : ३८६००-१२२८०० |
| | | पी बी - २ ९३००-३४८०० (निवडश्रेणी) | ४४०० | एस - १५ : ४१८००-१३२३०० |
| | क) पदवीधर नसलेले प्रशिक्षीत | पी बी - १ ५२००-२०२०० (मूळश्रेणी) | २८०० | एस - १० : २९२००-९२३०० |

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:05:36 +05'30'

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | प्राचार्य/अधिक्षक<br>१०० पेक्षा जास्त मान्य संख्या असलेली निवासी शाळा किंवा २०० पेक्षा जास्त संमत विदयार्थी संख्या असलेली अनिवासी शाळा (सन १९९७ नवीन शाळा संहितेप्रमाणे मंजूर केलेल्या पदाकरीता) संबंधीत प्रवर्गातील अपंगांना शिकविण्यासाठी मान्यता प्राप्त संस्थेतील प्रशिक्षीत पदवीधर | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(मूळ/वरिष्ठश्रेणी) | ४४०० | एस - १५ :<br>४१८००-१३२३०० |
| | | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(निवड श्रेणी) | ४८०० | एस - १७ :<br>४७६००-१५११०० |
| ३ | **उपप्राचार्य/अधिक्षक**<br>**अपंग वसतीगृह मुलांची संख्या ७५ किंवा दिवस शाळा मुलांची संख्या १०० किंवा त्याहून जास्त असेल अशा वसतीगृह आणि शाळांसाठी लागू संबंधीत प्रवर्गातील अपंगांना शिकविण्यासाठी मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षीत पदवीधर** | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(मूळश्रेणी) | ४३०० | एस - १४ :<br>३८६००-१२२८०० |
| | | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(वरिष्ठ श्रेणी) | ४४०० | एस - १५ :<br>४१८००-१३२३०० |
| | | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(निवड श्रेणी) | ४८०० | एस - १७ :<br>४७६००-१५११०० |
| ४ | आ) विशेष शिक्षक संबंधीत प्रवर्गातील दिव्यांगांना शिकविण्यासाठी मान्यता प्राप्त संस्थेतून प्रशिक्षीत पदवीधर (१९७३ च्या कर्मचारी रचना पध्दतीनुसार विशेष शिक्षकांच्या एकुण अनुशेष पदसंख्येच्या २१ टक्के एवढया संख्येएवढे मर्यादित) | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(मूळश्रेणी) | ४३०० | एस - १४ :<br>३८६००-१२२८०० |
| | | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(वरिष्ठश्रेणी) | ४४०० | एस - १५ :<br>४१८००-१३२३०० |
| | | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(निवडश्रेणी) | ४८०० | एस - १७ :<br>४७६००-१५११०० |
| | ब) प्रशिक्षीत पदवीधर विशेष शिक्षक | पी बी - १<br>५२००-२०२००<br>(मूळश्रेणी) | २८०० | एस - १० :<br>२९२००-९२३०० |
| | | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(वरिष्ठश्रेणी) | ४३०० | एस - १४ :<br>३८६००-१२२८०० |
| | क) प्रशिक्षीत माधमिक शाळा प्रमाणपत्रधारक (एस. एस. सी.) विशेष शिक्षक अथवा अप्रशिक्षीत पदवीधर | पी बी - १<br>५२००-२०२००<br>(मूळश्रेणी) | २८०० | एस - १० :<br>२९२००-९२३०० |
| | | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(वरिष्ठश्रेणी) | ४३०० | एस - १४ :<br>३८६००-१२२८०० |
| | | पी बी - २<br>९३००-३४८००<br>(वरिष्ठश्रेणी) | ४४०० | एस - १५ :<br>४१८००-१३२३०० |
| | ड) अप्रशिक्षीत माध्यमिक शाळा प्रमाणपत्रधारक (एस. एस. सी.) विशेष शिक्षक | पी बी - १<br>५२००-२०२०० | २००० | एस - ७ :<br>२१७००-६९१०० |

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:05:48 +05'30'

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | इ) प्रशिक्षीत /अप्रशिक्षीत माध्यमिक शाळा प्रमाणपत्रधारक (एस. एस. सी.) विशेष शिक्षक | पी बी - १ ५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| ५ | हस्त व्यवसाय/कलाशिक्षक, व्यवसाय शिक्षण, शारिरीक शिक्षण निदेशक, गायन शिक्षक, अवयव चनलशीलता निदेशक | पी बी - १ ५२००-२०२०० (मूळश्रेणी) | २८०० | एस - १० : २९२००-९२३०० |
| | | पी बी - २ ९३००-३४८०० वरिष्ठश्रेणी) | ४३०० | एस - १४ : ३८६००-१२२८०० |
| | | पी बी - २ ९३००-३४८०० (निवडश्रेणी) | ४४०० | एस - १५ : ४१८००-१३२३०० |
| ६ | भौतिक उपचार तज्ञ/व्यवसायोपचार तज्ञ/वाचा उपचार तज्ञ/ मानस शास्त्रज्ञ/ प्रशिक्षीत समाजसेवक (मान्यता प्राप्त संस्थेची पदवीका किंवा पदवी) | पी बी - २ ९३००-३४८०० | ४३०० | एस - १४ : ३८६००-१२२८०० |
| ७ | परिचारीका<br>१. बी.पी.एन. ए किंवा<br>२. दोन वर्षाचा वैदयकिय खात्याची परिचारीका प्रमाणपत्र धारक ए.एन. एम | पी बी - १ ५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |
| ८ | लेखापाल<br>(बी. कॉम किंवा अधिकच्या युनिटसाठी)<br>बी. कॉम किंवा लेखाशास्त्राची पदवीका/ लेखाशास्त्र आणि लेखाकार्य यातील दोन वर्षाचा अनुभव असलेला इतर विषयांचा पदवीधर | पी बी - १ ५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |
| ९ | वरिष्ठ लिपीक<br>विदयार्थी संख्या ७५ पेक्षा अधिक असलेल्या संस्थेसाठी कनिष्ठ लिपीकामधून बढती देवून | पी बी - १ ५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |
| १० | लिपीक/टंकलेखक (माध्यमिक शाळा प्रमाणपत्र धारक/ एस. एस. सी. पास आणि टंकलेखनातील प्रमाणपत्र) | पी बी - १ ५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| ११ | वाहन चालक प्राथमिक इयत्ता ४ थी आणि वाहन चालविण्याचा परवाना | पी बी - १ ५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| १२ | चपराशी<br>४ थी उत्तीर्ण | १ एस ४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| १३ | शाळा परिचर/राखणदार/पहारेकरी/ माळी/मोलकरीण/सह आचारी/काळजी वाहक (साक्षर) | १ एस ४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| १४ | सफाईगार<br>(साक्षर) | १ एस ४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:06:00 +05'30'

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | वसतिगृह अधिक्षक/पर्यवेक्षक/ अधिक्षीका (माध्यमिक शाळा प्रमाणपत्र धारक आणि प्रथमोपचाराचे ज्ञान) | पी बी - १ ५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| १६ | आचारी (साक्षर) | १ एस ४४४०-७४४० | १६०० | एस - ३ : १६६००-५२४०० |

**(२) स्वयंसेवी संस्थामार्फत अपंगांसाठी चालविण्यात येणाऱ्या विशेष कर्मशाळेतील संवर्गांना ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतन स्तर :-**

**(५० निवासी आणि ७५ अनिवासी पर्यत प्रशिक्षणार्थी असलेल्या कर्मशाळा)**

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतन संरचना | | ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रीक्स मधील वेतन (रु.) |
|---|---|---|---|---|
| | | वेतन बॅन्ड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | लेखापाल (वाणिज्य शाखेतील पदवी किंवा लेखाशास्त्रातील पदवीका किंवा लेखाशास्त्र आणि लेखाकार्य यातील दोन वर्षांचा अनुभव असलेला इतर विषयांचा पदवीधर | पी बी - १ ५२००-२०२०० | २४०० | एस - ८ : २५५००-८११०० |
| २ | लिपीक/टंकलेखक (माध्यमिक शाळा प्रमाणपत्र धारक/ एस. एस. सी. पास आणि टंकलेखनातील प्रमाणपत्र) | पी बी - १ ५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |
| ३ | शिपाई (४ थी उत्तीर्ण) | १ एस ४४४०-७४४० | १३०० | एस - १ : १५०००-४७६०० |
| ४ | वाहन चालक (अपंग मुलांची ने-आण करण्यासाठी संस्थेचे वाहन असल्यास) | पी बी - १ ५२००-२०२०० | १९०० | एस - ६ : १९९००-६३२०० |

**(३) ७५ पर्यत विदयार्थी संख्या असणाऱ्या कर्मशाळा संलग्नीत वसतीगृहांतील संवर्गांना ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतन स्तर :-**

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतन संरचना | | ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर (रु.) |
|---|---|---|---|---|
| | | वेतन बॅन्ड (रु.) | ग्रेड वेतन (रु.) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्वयंपाकी | १ एस ४४४०-७४४० | १६०० | एस - ३ : १६६००-५२४०० |

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:06:14 +05'30'

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | सहायक स्वयंपाकी | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ :<br>१५०००-४७६०० |
| ३ | राखणदार | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ :<br>१५०००-४७६०० |
| ४ | मोलकरीण | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ :<br>१५०००-४७६०० |
| ५ | सफाईगार (साक्षर) | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ :<br>१५०००-४७६०० |
| ६ | पहारेकरी (साक्षर) | १ एस<br>४४४०-७४४० | १३०० | एस - १ :<br>१५०००-४७६०० |

(४) कर्मशाळा :- समाज कल्याण सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग शासन निर्णय क्र.इडीडी १०१६/प्र.क्र.४८७/सुधार-२, दि.२२ ऑक्टोबर १९९७ अन्वये शैक्षणिक अर्हता शिथील असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतन स्तर :-

(५० निवासी आणि ७५ अनिवासी पर्यंत प्रशिक्षणार्थी असलेल्या कर्मशाळा)

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतन संरचना | | सुधारित वेतन मॅट्रीक्स मधील वेतन |
|---|---|---|---|---|
| | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | लिपीक/टंकलेखक<br>(एस. एस. सी. नापास) | पी बी - १<br>५२००-२०२०० | १८०० | एस - ५ :<br>१८०००-५६९०० |
| २ | वाहन चालक<br>(३ री वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक) | पी बी- १<br>५२००-२०२०० | १९०० | एस - ६ :<br>१९९००-६३२०० |

टिप- उपरोक्त पदांपैकी काही पदे ही शासन निर्णय दिनांक १८.८.२००४ नुसार व्यपगत होणार आहेत.

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.04.23 16:06:25 +05'30'